**ठळक बातम्या**

- दिल्लीच्या रामलीला मैदानावर झालेल्या काँग्रेसच्या सभेत प्रधानमंत्र्यांविषयी आक्षेपार्ह विधानं झाल्याचा भाजपाचा आरोप / संसदेत सत्ताधारी सदस्यांचा गदारोळ

- देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७५व्या पुण्यतिथीनिमित्त देशाची आदरांजली

- देशाचे नवीन मुख्य माहिती आयुक्त म्हणून राजकुमार गोयल यांचा शपथविधी

- राज्यशासनाच्या बहुतेक विभागांमधे अनुदाने वेळेवर खर्च होत नसल्याचं कॅगचं निरीक्षण

आणि

- महानगरपालिका निवडणुकांचा कार्यक्रम आज जाहीर होण्याची शक्यता

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल काँग्रेस नेत्यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप करुन काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी करत, सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी आज संसदेत गदारोळ केला. घोषणाबाजी सतत चालू राहील्यामुळे लोकसभेचं कामकाज आधी १२ वजेपर्यंत आणि नंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

दिल्लीच्या रामलीला मैदानावर काल झालेल्या काँग्रेसच्या सभेत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा मुद्दा संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज लोकसभेत उपस्थित केला. अशा प्रकारचं वक्तव्य हे दुर्दैवी आणि लाजिरवाणं आहे असं रिजिजू म्हणाले. यानंतर सत्ताधारी पक्षाच्या

खासदारांनी घोषणाबाजी सुरू केली, गोंधळ वाढत गेल्यामुळे सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज दुपारी बारा वाजेपर्यंत तहकूब केलं.

त्यानंतर दुपारी बारा वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर सत्ताधारी सदस्यांनी घोषणाबाजी सुरूच ठेवली आणि कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

राज्यसभेतही या मुद्यावरुन गदारोळ झाला. आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल काँग्रेसने माफी मागावी अशी मागणी सभागृह नेते जे पी नड्डा यांनी केली. त्यानंतर घोषणांचा गदारोळ वाढत गेल्यानं उपाध्यक्ष हरिवंश यानी सभागृहाचं कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. राज्यसभेचं कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर निवडणूक सुधारणांविषयी चर्चेला सुरुवात झाली.

**दरम्यान,** संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या कथित आक्षेपार्ह टिप्पणीचा संसदेच्या आवारात वार्ताहरांशी बोलताना निषेध केला. राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनी दोन्ही सभागृहांमधे माफी मागावी अशी मागणी त्यांनी केली. भाजपा आणि रालोआ कधीही कुणाचाही अपमान करत नाहीत असं ते म्हणाले…

**- - - होल्ड बाईट रिजिजू - -**

**<><><><><>**

काँग्रेसनं काल दिल्लीत घेतलेल्या सभेत प्रधानमंत्र्यांविषयी केलेल्या वक्तव्यांमधून त्यांची मनोवृत्ती आणि संस्कृती दिसून येते, अशी टीका जदयुचे ज्येष्ठ नेते केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी केली आहे. तर राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षानं भान गमावलं आहे, अशी टीका केंद्रीय मंत्री प्रह्लाद जोशी यांनी केली आहे.

दरम्यान, कालच्या सभेत अशा प्रकारची विधानं कुणीही केली नसल्याचं सांगत, काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी यांनी भाजपाचे आरोप फेटाळून लावले

आहेत. हे आरोप बिनबुडाचे असून सरकारला सभागृह चालवायची इच्छा नाही, असंही त्या म्हणाल्या.

- **- - होल्ड - बाईट- प्रियंका गांधी - -**

**<><><><><>**

देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या ७५व्या पुण्यतिथीनिमित्त देश त्यांना अभिवादन करत आहे.

सरदार पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर देशातल्या अनेक संस्थानंचं विलनीकरण करून एकसंध भारताच्या निर्मितीत अमूल्य योगदान दिलं, असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या आदरांजली संदेशात म्हटलं आहे. पटेल यांची विचारधारा हीच एक भारत श्रेष्ठ भारत अभियानाची प्रेरणा असल्याचंही ते म्हणाले.

लोहपुरुष सरदार पटेल यांनी देशाला एका सूत्रात बांधण्यासाठी आपलं जीवन समर्पित केलं, अशा शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांना आदरांजली वाहिली.

सरदार पटेल यांनी देशांतर्गत स्थिरता शांतता स्थापित करण्याला आपला जीवन उद्देश बनवलं होतं, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या समाज माध्यम संदेशात म्हटलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सरदार वल्लभभाई पटेल यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या ३ देशांच्या दौऱ्यावर रवाना झाले. सर्वप्रथम ते जॉर्डनला भेट देतील. याशिवाय ते जॉर्डनमधल्या भारतीय समुदायाचीही भेट घेणार आहेत.

त्यानंतर ते  इथिओपिया आणि  ओमानला भेट देणार आहेत.

**<><><><><>**

देशाचे नवीन मुख्य माहिती आयुक्त म्हणून राजकुमार गोयल यांनी आज शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोयल यांना पदाची शपथ दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली ३ जणांच्या समितीने गोयल यांच्या नावाची शिफारस गेल्या आठवड्यात या पदासाठी केली. राजकुमार गोयल हे भारतीय प्रशासकीय सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी असून केंद्र सरकारच्या न्याय विभागाचे सचिव म्हणून गेल्या ऑगस्टमधे सेवानिवृत्त झाले. या समितीने इतर ८ आयुक्तांची नावंही सुचवली असून, तब्बल ९ वर्षांनंतर माहिती आयोगात सर्व आयुक्तांची पदं भरली आहेत.

**<><><><><>**

राज्य सरकारमधल्या अनेक विभागांनी गेल्या आर्थिक वर्ष अखेर सुमारे पावणे २ लाख कोटी रुपयांच्या खर्चाचे हिशोब सादर केलेले नाहीत, असं कॅगच्या अहवालात समोर आलं आहे. रविवारी विधीमंडळात हा अहवाल सादर करण्यात आला. त्यानुसार ३१ मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाअखेर सुमारे पावणे ५३ हजार प्रकरणांमध्ये १ लाख ७७ हजार कोटींहून अधिक रुपयाच्या खर्चाचे हिशेब सादर झालेली नाहीत. तर ४० हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये १ लाख ३७ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेची खर्चाचे हिशोब सादर झाल्याचं कॅगनं नमूद केलं आहे. नगर विकास विभागाकडे सर्वाधिक ११ हजार कोटी, नियोजन विभागाकडे ५ हजार ८०० कोटी रुपये, जलसंपदा विभागाकडे ३ हजार ६०० कोटी रुपयांचे हिशेब प्रलंबित आहेत, असं यात नमूद आहे.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यकारभारात लोकशाहीची आणि समतेची तत्त्वं दिसतात, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. सांगली इथं अहिल्यादेवी होळकर यांच्या अश्वारूढ

पुतळ्याचं लोकार्पण आणि वीज उपकेंद्राचं भूमिपूजन केल्यानंतर ते बोलत होते. त्यानंतर इचलकरंजी महानगरपालिकेच्या विविध विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण फडणवीस यांच्या हस्ते झालं. इचलकरंजी महानगरपालिकेच्या पुढच्या ५ वर्षांच्या जीएसटी परताव्याबाबत सर्व प्रक्रिया पूर्ण केली असून मनाप्रमाणे जीएसटी परतावा मिळेल, असं आश्वासन फडणवीस यांनी यावेळी दिलं.

**<><><><><>**

राज्य निवडणूक आयोगानं आज दुपारी ४ वाजता वार्ताहर परिषद बोलावली आहे. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यावेळी वार्ताहरांशी संवाद साधणार आहेत. महानगरपालिकांच्या प्रलंबित निवडणुकांचा कार्यक्रम यावेळी जाहीर होण्याची शक्यता आहे.

महानगरपालिका निवडणुकींच्या उंबरठ्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या माजी नगरसेवक तेजस्वी घोसाळकर यांनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे. मुंबई भाजपा अध्यक्ष अमित साटम आणि आमदार प्रवीण दरेकर यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.

**<><><><><>**

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित चलनफुगवट्याचा दर नोव्हेंबरमधे ऑक्टोबरच्या तुलनेत ८९ शतांशांनी वाढून उणे ३२ शतांश टक्के राहिला. ऑक्टोबरमधे हा दर उणे १ पूर्णांक २१ शतांशांवर होता. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने आज ही आकडेवारी जाहीर केली. अन्नपदार्थांच्या किमतींचा निर्देशांक गेल्या वर्षीच्या नोव्हेंबरच्या तुलनेत २ पूर्णांक ६ दशांशांनी कमी होता.

**<><><><><>**

दुबई आणि अर्मेनिया इथून काम करणाऱ्या दोन दहशतवाद्यांना पंजाब पोलिसांनी केंद्रीय यंत्रणांच्या मदतीनं मुंबईतून अटक केली आहे. पंजाबमध्ये अनेक

ठिकाणी खून, खंडणी आणि तत्सम गुन्ह्यांमध्ये हे दोघं सामील असल्याची माहिती पंजाबचे पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी दिली आहे.

**<><><><><>**

अर्जेंटिनाचा फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आज त्याच्या GOAT इंडिया दौऱ्याच्या चौथ्या आणि अंतिम टप्प्यासाठी नवी दिल्लीत पोहोचेल.

अरुण जेटली मैदानावर मुख्य कार्यक्रम होणार आहे. यावेळी मेस्सी तीन युवा ट्रॉफी जिंकणाऱ्या मिनर्वा अकादमीच्या संघांचा सत्कार करणार आहे.

**//<><><><><>//**